# मे. दिवाणी न्यायधिश साहेब ('क' स्तर) न्यायालय, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई जि.बीड

Exh-5/D

रे.दि.दा नं. /2026

वादी :— नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे, वय 52 वर्षे, धंदा शेती
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड
ह.मु. रां.उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

विरुध्द

प्रतिवादी :— 1. गोविंदराव पिता नामाजी नागरगोजे
वय :— 95 वर्षे, धंदा :— शेती
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

2. सिंधुबाई भ्र. गोविंदराव नागरगोजे
वय :—76 वर्षे, धंदा :— घरकाम
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी

3. मधुकर पिता गोविंदराव नागरगोजे
वय :—40 वर्षे, धंदा :— शेती,
रा. उखळी खुर्द ता. गंगाखेड जि.परभणी
ह.मु. शिक्रापुर ता. शिरुर जि.पुणे

नि. अ. नाथराव

प्रकरण :— तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणे बाबत

**अर्जदार/वादी आदेश 39 नियम 1 व 2 दिवाणी प्रक्रिया संहिता अन्वये तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळणे करीता गैरअर्जदाराच्या विरुध्द खालीलप्रमाणे सादर करीत आहे.**

1. हे की, प्रस्तुत प्रकरणातील वादी व प्रतिवादी हे एकत्रित हिंदु कुंटुंबाचे घटक असून वादी व प्रतिवादी क्र. 3 हे आपसात सख्खे भाऊ असून प्रतिवादी क्र. 1 व 2 हे त्यांचे आई वडील आहेत. प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचा दुसरा मुलगा नामे मनोहर गोविंदराव नागरगोजे याचे निधन झालेले आहे.

2. हे की, मौ. वरवटी ता.अंबाजोगाई जि.बीड शिवारातील वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 3 यांच्या एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित शेत जमिन मिळकती खालील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | सर्वे नं. / गट नं. | क्षेत्र | आकार | कोणाच्या नावे आहे |
|---|---|---|---|---|
| 1 | 400 | 00 हे. 52 आर | 00 रु. 70 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| 2 | 183 | 00 हे. 54 आर | 00 रु. 25 पै | प्रतिवादी क्र. 2 |
| | एकुण | 01 हे. 06 आर | 00 रु. 95 पै | |

वर नमुद मिळकतीस यापुढे दाव्यात "वादग्रस्त मिळकत" असे संबोधण्यात येते

3. हे की, वाद दाव्यातील वादग्रस्त मिळकतीवर वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 5 यांचा एकत्रित कुंटुबाचा संयुक्तिक ताबा असून वादग्रस्त मिळकत ही एकत्रित कुंटुबाची वडीलोपार्जित मिळकत असून सदरील मिळकतीबाबत अद्यापपावेतो वादी व प्रतिवादी यांच्यात कसल्याही प्रकारच्या वाटण्या झालेल्या नाहीत. त्यामुळे वादीने दिनांक 25/01/2026 रोजी प्रतिवादींना वादग्रस्त मिळकतीच्या सरसानिरस मानाने वाटण्या करुन स्वतंत्र ताबा मागितला असता प्रतिवादींनी त्यास स्पष्ट नकार देवुन वादींनां वादग्रस्त मिळकतीतुन बेदखल करण्याची व वादग्रस्त मिळकतीच्या 7/12 व महसुली अभिलेखात प्रतिवादीं क्र. 1 यांची नावे असल्याचा गैरफायदा घेवुन वादग्रस्त जमिन गट नं. 400 मधील जमिन इतरांस विक्री करण्याची धमकी दिली तसेच आमच्या नावे असलेली सर्व वादग्रस्त मिळकत आम्ही विकुन टाकणार आहोत तुम्हांला काय ते कर असे स्पष्टपणे सांगितले. करीता वादीस प्रतिवादीं विरुध्द प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण हे दिनांक 25/01/2026 रोजी घडले आहे.

नि. अ. गायकवाड

4. हे की, वादींची सकृतदर्शनी केस वादीच्या बाजुने असून सोयीचा समतोल ही वादीच्या बाजुने आहे जर तुर्तातुर्त मनाई हुकुम वादींच्या हक्कात व प्रतिवादींच्या विरुध्द दिला नाही तर वादींना त्यांच्या हक्कापासून वंचित राहुन कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. करीता प्रतिवादींनी स्वतः अथवा इतरां मार्फत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो वादग्रस्त मिळकत इतर कोणासही हस्तांतरण, दान, गहाण, विक्री अथवा इतर कसल्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये अथवा सदर वादग्रस्त मिळकतीवर

कसल्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम वादींच्या हक्कात व प्रतिवादीं विरुध्द मंजुर करणे न्यायोचित आहे. सोबत वादीचे शपथपत्र जोडले आहे.

## तरी विनंती की,

अर्ज मंजुर करण्यात येवुन प्रतिवादींनी स्वतः अथवा इतरां मार्फतं वादग्रस्त मिळकत दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादीं यांनी वादग्रस्त मिळकत इतर कोणासही हस्तांतरण, दान, गहाण, विक्री अथवा इतर कसल्याही प्रकारे हस्तांतरीत करु नये अथवा सदर वादग्रस्त मिळकतीवर कसल्याही प्रकारचा बोजा निर्माण करु नये अशा प्रकारचा तुर्तातुर्त मनाई हुकुम वादींच्या हक्कात व प्रतिवादी विरुध्द मंजुर करण्यात यावा.

दिनांक :– 2 / 02 / 2026
स्थळ :– अंबाजोगाई

वादी
नि.अ. नाथराव
नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड

## सत्यापन

प्रस्तुतच्या दाव्यातील संपुर्ण मजकुर खरा व बरोबर असून त्यावर आम्ही समजुन उमजनु तसदिका केल्या आहेत

दिनांक :– 2 / 02 / 2026
स्थळ :– अंबाजोगाई

वादी
नि.अ. नाथराव
नाथराव पिता गोविंदराव नागरगोजे,
रा. वरवटी ता. अंबाजोगाई जि.बीड

मार्फत

ॲड. व्हि.डी.शिंदे (चनईकर)
ॲड. व्हि.बी.भुरे
अंबाजोगाई